ज्ञानगंगा घरोघरी

सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)
(महाराष्ट्र शासनाने स्थापिलेले)
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक- ४२२२२२
दूरध्वनी : कार्यालय (०२५३) २२३११०५, २२३०११८, २२३०७१४, २२३०७१५ ई-मेल : dir_ssd@ycmou.digitaluniversity.ac

**विद्यार्थी सेवा विभाग**

जा.क्र. : वि.से.वि./२०२२/३२९/२७८
दिनांक : ०८/१२/२०२२

प्रति,
मा.प्राचार्य
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र
आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज,चिखलदरा
**मु. चिखलदरा, जि. अमरावती – ४४४८०७**

**विषय : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ - अभ्यासकेंद्र मान्यतेबाबत...**

**महोदय,**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना १ जुलै १९८९ रोजी महाराष्ट्र विधिमंडळ कायदा XX (१९८९) अन्वये झाली असून विद्यापीठ अनुदान आयोगाचे मान्यताप्राप्त विद्यापीठ आहे. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात वरीष्ठ महाविद्यालयांना विद्यापीठाची नवीन अभ्यासकेंद्रे/नवीन शिक्षणक्रम देणे विचाराधीन होते.त्यानुसार वरीष्ठ महाविद्यालयांकडून नवीन अभ्यासकेंद्र सुरू करण्याबाबत विहित नमुन्यात प्रस्ताव अर्ज मागविण्यात आले होते.

विभागीय केंद्र आणि विद्यापीठाच्या स्तरावर नवीन अभ्यासकेंद्र / नवीन शिक्षणक्रम मागणी प्रस्तावाची समितीद्वारे छाननी करून अंतिम मान्यतेसाठी मा. कुलगुरू यांच्याकडे शिफारस केली होती. त्यास मा.कुलगुरू यांनी खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.

| विद्याशाखेचे नाव | विभागीय केंद्राचे नाव | महाविद्यालयाचे / अभ्यासकेंद्राचे नाव | अभ्यासकेंद्र संकेतांक | मान्यता दिलेल्या शिक्षणक्रमांचे नाव व शिक्षणक्रम सांकेतांक | प्रवेश क्षमता | मान्यता वर्ष व कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | अमरावती | आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, चिखलदरा | 12252 | एम.कॉम. (M17) | ६० | २०२२-२०२३ एक वर्ष |

1. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्रासाठी वरीष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य हे केंद्रप्रमुख असतील आणि प्राचार्यांनी नेमून दिलेले वरीष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक हे केंद्र संयोजक म्हणून काम पाहतील. दैनंदिन कामकाजासाठी सहायक, शिपाई या पदावरील कर्मचाऱ्यांची नेमणूक महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांमधून प्राचार्य यांनी करावी.
2. मुक्त विद्यापीठाच्या कामासाठी विद्यापिठाच्या नियमानुसार मानधन देय राहील. याबाबतची माहिती आपल्या विभागीय केंद्रावरून प्राप्त करून घ्यावी.
3. अभ्यासकेंद्र प्रमुख (प्राचार्य) आणि अभ्यासकेंद्र संयोजक या दोघांच्या अधिकारातील (Joint Account) संयुक्त बँक खाते हे राष्ट्रीयकृत बँकेतच असावे. खाजगी किंवा को-ऑपरेटिव्ह बँकेत खाते उघडता येणार नाही. अभ्यासकेंद्राचे सर्व आर्थिक व्यवहार हे अभ्यासकेंद्र प्रमुख व केंद्र संयोजक यांच्या स्वाक्षरीनेच करावे.

4. बँकेतील खात्याचे नाव पुढीलप्रमाणे असावे : **केंद्रप्रमुख / केंद्रसंयोजक,य.च.म.मु.विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र,आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज,चिखलदरा**

5. अभ्यासकेंद्राच्या खात्यावरील सर्व व्यवहार स्वतंत्र असावेत. खात्यावरील रक्कम संस्थेच्या खात्यावर वर्ग करता येणार नाही किंवा संस्थेस परस्पर देता येणार नाही याची नोंद घ्यावी.

6. विद्यापीठाने शिक्षणक्रमनिहाय ठरवून दिलेल्या शुल्काव्यतिरिक्त इतर कोणतेही जादाचे शुल्क विद्यार्थ्यांकडून स्वीकारता येणार नाही.याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास अभ्यासकेंद्र बंद करण्याचा अधिकार विद्यापिठाचा असेल.

7. अभ्यासकेंद्रावर कार्यरत अभ्यासकेंद्र प्रमुख, केंद्र संयोजक, समंत्रक, सहायक, शिपाई यांचे मानधन RTGS ने त्यांच्या खात्यावर जमा करावे.

8. महाविद्यालयाच्या दर्शनी भागात अभ्यासकेंद्राचा ४’ X ८’ फुट आकाराचा नामफलक लावावा. तसेच दुसरा नामफलक ३’ फुट X ६’ फुट आकाराचा कार्लायासमोर असावा. नामफलक तयार करताना १८ गेजचा पत्रा वापरावा. फलकाचा रंग आकाशी निळा व अक्षरे पांढऱ्या रंगात असावी. विद्यापीठाचा लोगो गेरव्या रंगत असावा. अभ्यासकेंद्र संयोजकाच्या कार्यालयात अथवा बाहेर भिंतीवर शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांची वर्षनिहाय नोंदणी संख्या दर्शवणारा बोर्ड असावा.

9. अभ्यासकेंद्रावरील सर्व रेकॉर्डस अद्यावत ठेवावे : कॅशबुक, लेजर, अभ्यासकेंद्र प्रमुख, केंद्रसंयोजक, समंत्रक, सहायक, शिपाई, आणि विद्यार्थ्यांचे विषयानुसार उपस्थिती पत्रक, मानधन देयके, खरेदी रजिस्टर, ईश्यु रजिस्टर, जडवस्तू नोंदवही शिक्षणक्रमानुसार पुस्तकांचासाठा, ऑडीट स्टेटमेंट्स व इतर अभ्यासकेंद्राशी संबंधतीत सर्व रेकॉर्डस अद्यावत ठेवण्याची जबाबदारी अभ्यासकेंद्र संयोजक आणि लेखापाल सहायक यांची आहे. दरवर्षी आपल्या अभ्यासकेंद्राने ऑडीट रिपोर्ट मे अखेर पर्यंत विभागीय केंद्राला पाठविणे अनिवार्य आहे.

10. प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला अभ्यासकेंद्राने त्या शैक्षणिक वर्षाचे समंत्रणाचे वेळापत्रक तयार करून आपल्या विभागातील विभागीय संचालकांना मेल करावे,तसेच सदर वेळापत्रक नोटीसबोर्डवर देखील लावावे.

11. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच त्यांच्यातील क्रीडा गुणांना संधी देणे. वार्षिक संमेलने आयोजित करणे. प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार करणे, विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करणे, श्रमदानातून स्वच्छता, वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, विद्यार्थ्यांचा यशोगाथा, बाहेरील तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करणे, विद्यापीठाच्या अश्वमेध व इंद्रधनुष्य कार्यक्रमात विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सहभाग नोंदवणे आवश्यक आहे.

12. परीक्षा सुरुवातीपासूनच कॉपीमुक्त वातावरणात आयोजित करून आदर्श अभ्यासकेंद्रासाठी प्रयत्न करावे. अभ्यासकेंद्रावर संपर्कसत्र आयोजित न करणे, परीक्षेमध्ये गैरप्रकार, विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क स्वीकारणे, आर्थिक अनियमितता, विद्यार्थ्यांने दिलेल्या तक्रारीचे विवध कारणे इत्यादी कारणांसाठी आगाऊ नोटीस देऊन अभ्यासकेंद्र बंद करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेलाआहे,याची नोंद घ्यावी.

13. अभ्यासकेंद्र प्रमुख, समंत्रक, सहायक, शिपाई, विषयानुसार समंत्रकांची नावे, दूरध्वनी क्रमांक, ई-मेल, मोबाईल नंबर इत्यादी माहिती आपल्या विभागातील विभागीय संचालक तसेच संचालक,विद्यार्थी सेवा विभाग यांना कळविणे अनिवार्य आहे.

14. आपल्या अभ्यासकेंद्राने शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये केलेले कार्याचे मूल्यमापन करून पुढीलमान्यता देण्यात येईल. आपण आपल्या अभ्यासकेंद्रावरील मुक्त शिक्षणाचादर्जा आणि गुणवत्ता राखून आपले अभ्यासकेंद्र एक उत्कृष्ट अभ्यासकेंद्र म्हणून नाव लौकिकास येईल यासाठी प्रयत्न करावे.

**आपल्या अभ्यासकेंद्राच्या पुढील वाटचालीसाठी विद्यापीठाच्या वतीने हार्दिक शुभेच्छा !**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक-४२२२२२

**(प्रा. डॉ. प्रकाश देशमुख)**
**संचालक**
**विद्यार्थी सेवा विभाग**

**प्रत माहितीसाठी :**

1. मा. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
2. मा. संचालक, अंतर्गत मूल्यमापन आणि गुणवत्ता केंद्र
3. मा. परीक्षा नियंत्रक
4. मा. वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, विभागीय केंद्र, अमरावती